# Session No : 4

## Date : 10/09/25

## News : Sanchar

संचार

सुभाष शिंदे

# सावळेश्वर विद्यालयात विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेविषयी केले मार्गदर्शन

## ऑनलाइन फसवणुकीपासून सावध राहण्याच्या दिल्या सूचना

संचार वृत्तसेवा

▶ कुरुल, दि. ९-

मोहोळ तालुक्यातील सावळेश्वर येथील समता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम किकहिल फाउंडेशन आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला.

यावेळी संगणकशास्त्र संकुलातील तेजश्री पवार आणि पूजा हांडे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. डिजिटल युगात ऑनलाइन फसवणुकीच्या वाढत्या घटनांचा उल्लेख करत, त्यांनी अनेक उपयुक्त सूचना दिल्या. मार्गदर्शनात त्यांनी सांगितले की, अनोळखी व्यक्तींना कधीही ओटीपी सांगू नये. तसेच अनोळखी नंबरवरून आलेल्या कॉल्सची पडताळणी करावी. सोशल मीडियावर येणाऱ्या मेसेजेस किंवा लिंकवर क्लिक करण्यापूर्वी त्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. आपला पासवर्ड नेहमी स्ट्रॉंग असावा आणि वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा. आपली माहिती ही आपली जबाबदारी आहे हे लक्षात ठेवून इंटरनेटचा वापर करावा, असेही त्यांनी सांगितले.



या कार्यक्रमास प्राचार्य धनाजी पाटील, कालिदास गावडे, गोविंद जाधव, शशिकांत पैकेकरी, सचिन गावडे, सखाराम साठे, बाळासाहेब अडसूळ, विमल माने यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.